स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्य

विद्याशाखेअंतर्गत पीएच.डी. पदवीसाठी संशोधन आराखडा

विषय : इतिहास

:: संशोधन विषय ::

छत्रपती प्रतापसिंह यांचे जीवन व कार्याचा चिकित्सक अभ्यास

:: संशोधक ::

श्री राम संपत्ती कदम

(एम. ए. इतिहास, सेट)

मो. नं.: 9637298808

Email Id: rams.kadam@gmail.com

::संशोधन मार्गदर्शक::

प्रा. डॉ. बब्रूवान केरबाजी मोरे

(इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक)

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर. ता. अहमदपूर जि. लातूर.

मो. नं. 9923351678, 8830826234.

Email ID: babruwanmore@gmail.com

‘छत्रपती प्रतापसिंह यांचे जीवन व कार्याचा चिकित्सक अभ्यास’

प्रास्ताविक:

स्वराज्याचे प्रथम छत्रपती म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी 6 जून 1674 रोजी केलेल्या राज्याभिषेकानंतर 34व्या वर्षी अंतर्गत कलहाचा परिणाम म्हणून स्वराज्याच्या दोन गाद्या निर्माण झाल्या. 12 जानेवारी 1708 रोजी सातारा येथे छत्रपती शाहू महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करून घेत स्वतःला छत्रपती घोषित केले, तर कोल्हापूर येथे महाराणी ताराबाई यांनी स्वतःचा पुत्र दुसरा शिवाजी यास गादीवर बसवून राज्यकारभार करण्यास सुरुवात केली. इसवी सन 1749 मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती पदाचे राजकीय महत्त्व कमी होत पेशवे पदाचे महत्त्व वाढून वास्तविक सत्ताप्रमुख म्हणून पेशव्यांची पेशवाई प्रस्थापित झाली. छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती रामराजे (1749 ते 1777), छत्रपती शाहू दुसरे (1778 ते 1808) आणि पुढे 1808 साली धाकट्या शाहू महाराजांच्या निधनानंतर त्यांचे थोरले पुत्र प्रतापसिंह सातारच्या गादीवर आले. इसवी सन 1808 मध्ये झालेल्या पेशवाईच्या अस्तानंतर प्रतापसिंहांकडे छोटासा प्रदेश देऊन सातारा राज्य कायम ठेवण्यात आले.

छत्रपती प्रताप सिंहाच्या संपूर्ण जीवनकाळात अनेक घडामोडी घडल्या. त्याला तोंड देत छत्रपती शिवाजी महाराजांचा वास्तविक वारस म्हणून छत्रपती प्रतापसिंह यांनी अनेक लोकोपयोगी कामे करत कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्यांचे

जीवन चरित्र व कार्य जनसामान्यांसमोर येणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांच्या कार्यकाळातील प्रकाशित व प्रकाशित साधनांचा चिकित्सक अभ्यास करून त्यावर संशोधन होणे आवश्यक आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

प्रस्तावित विषयाचे संशोधन खालील उद्दिष्टे समोर ठेवून करण्यात येणार आहे.

01. छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करणे.

02. छत्रपती प्रतापसिंहांच्या राज्यकारभाराचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करणे.

03. छत्रपती प्रतापसिंह यांनी केलेल्या लोकोपयोगी कामांचा अभ्यास करणे.

04. छत्रपती प्रतापसिंह व पेशवे यांच्यातील परस्परसंबंधांच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे.

05. छत्रपती प्रतापसिंह व ब्रिटिश यांच्यातील संबंधांचा अभ्यास करणे.

06. छत्रपती प्रतापसिंहांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा शोध घेणे.

संशोधनाची गृहीतके:

प्रस्तावित विषयावर संशोधन करताना खालील गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

01. छत्रपती प्रतापसिंह यांची कारकीर्द महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण कारकीर्द आहे.

02. छत्रपती प्रतापसिंह हे स्वतंत्र विचाराचे सत्यनिष्ठ व्यक्तिमत्व होते.

03. छत्रपती प्रतापसिंह यांना पेशवे व इंग्रजांच्या सोबत संघर्ष करावा लागला.

04. छत्रपती प्रतापसिंह हे आधुनिक विचाराचे व न्यायप्रिय राजे होते.

05. छत्रपती प्रतापसिंह यांनी त्यांच्या राज्यात अनेक लोकोपयोगी कामे केली.

संशोधनाची आवश्यकता :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे वारसदार वंशज म्हणून छत्रपती प्रतापसिंह यांच्या जीवनकाळातील महत्त्वपूर्ण घटनांचा चिकित्सकपणे अभ्यास होणे आवश्यक आहे. तत्कालीन घटनांचा सखोल परिणाम महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जडणघडणीवर मोठ्या प्रमाणात झालेला आहे. त्यामुळे तत्कालीन घटनांची उकल संशोधनाच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे. आधुनिक भारताच्या इतिहासाच्या उंबरठ्यावर घडलेला हा इतिहास आहे. याचाच अर्थ मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास आणि आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाला जोडणारे अनेक दुवे या कालखंडात निश्चितपणे सापडतील. म्हणून 'छत्रपती प्रतापसिंह: व्यक्ती आणि कार्य ' या विषयावर संशोधन होणे आवश्यक आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व कालखंड :

सदरील संशोधन कार्याच्या विषयाशी संबंधित कालावधी हा छत्रपती प्रताप सिंह यांचा जन्म **18** जानेवारी **1793** ते मृत्यू **14** ऑक्टोबर **1847** हा निश्चित करण्यात आला आहे.

संशोधन पद्धती :

संबंधित विषयाच्या संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार आहे. अप्रकाशित व प्रकाशित प्रथम दर्जाची साधने, दुय्यम दर्जाची साधने आणि संबंधित संदर्भ ग्रंथ यांचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करून संशोधन केले जाणार आहे.

प्रकरणांची रूपरेषा :

संबंधित संशोधन कार्याच्या प्रकरणांची रूपरेषा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे. प्रत्यक्ष संशोधन करताना आवश्यकतेनुसार प्रकरणांच्या नावात किंवा संख्येत बदल केला जाऊ शकतो.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

6 जून 1674 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगड किल्ल्यावर राज्याभिषेक करून घेत छत्रपती पद धारण केले. आई राजमाता जिजाऊ आणि वडील शहाजीराजे भोसले यांचे स्वप्न सत्यात उतरवत स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्याचा विस्तार करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांना फारसा कालावधी मिळाला नाही. 3 एप्रिल 1680 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज स्वराज्याचे दुसरे छत्रपती झाले. त्यांना मिळालेली नऊ वर्ष अत्यंत धामधुमीची आणि संघर्षाची होती. एकाच वेळेस अनेक शत्रूंची झुंज द्देत असताना संगमेश्वर येथे ई. सन 1689 मध्ये दगाफटका करून मुघल सैन्याने त्यांना कैद केले आणि 11 मार्च 1689 रोजी त्यांची अमानुष छळ करून हत्या करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याच्या संरक्षणाची जबाबदारी राजाराम महाराजांवर आली होती. मराठ्यांचा मुघलांशी निकराचा लढा चालू असताना मुघल सैन्याने रायगडाला वेढा दिला. अशावेळी छत्रपती संभाजी महाराजांच्या वीर पत्नी महाराणी येसूबाईंनी रायगड किल्ला लढण्याची जबाबदारी स्वतःवर घेतली आणि राजाराम महाराज जिंजीच्या किल्ल्यावर गेले. रायगड मोघलांच्या ताब्यात गेला आणि महाराणी येसूबाई व त्यांचा पुत्र शाहू यांना कैद करण्यात आले. पुढे ३ मार्च 1700 रोजी प्रकृती अस्वास्थ्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांचा मृत्यू झाला. राजाराम महाराजांच्या निधनानंतर त्यांच्या वीर पत्नी महाराणी

ताराबाई यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. त्यांनी मुघलांशी सात वर्षापेक्षा जास्त काळ निकराचा लढा दिला. इसवी सन 1707 मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाल्यानंतर वारसा हक्कांसाठी त्याच्या वारसदारांमध्ये संघर्ष सुरू झाला. अशावेळी मराठ्यांमध्ये दुहीची बीजे पेरण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांचा पुत्र शाहू महाराज यांना कैदेतून मुक्त करण्यात आले. शाहू महाराज व महाराणी ताराबाई यांच्यात छत्रपती पदाच्या वारसा हक्कासाठी संघर्ष सुरू झाला. मराठा सरदार दोन्ही गटात विभागले गेले. इसवी सन 1707 साली झालेल्या लढाईत शाहू महाराजांची सरशी झाली आणि महाराणी ताराबाईंच्या पक्षातील अनेक सरदार शाहू राजांना येऊन मिळाले. शाहू महाराजांचा पक्ष बळकट झाला. सातारा येथे 12 जानेवारी 1708 रोजी शाहू महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करून घेत स्वतःला छत्रपती घोषित केले. महाराणी ताराबाई यांनी आपला मुलगा शिवाजी दुसरा यास गादीवर बसवून कोल्हापूर येथे वेगळी गादी स्थापन केली. अशा प्रकारे स्वराज्याच्या छत्रपती पदाच्या दोन गाद्या निर्माण झाल्या. इसवी सन 1749 मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती रामराजा गादीवर आले. तोपर्यंत छत्रपती पदापेक्षा पेशवे पदाचे महत्व वाढत जाऊन वास्तविक स्वरूपात पेशव्यांची सत्ता प्रस्थापित झाली होती. छत्रपती पद नाममात्र म्हणून शिल्लक राहिले होते. छत्रपती रामराजे यांच्या मृत्यूनंतर दुसरे शाहू हे सातारा गादीचे छत्रपती झाले. ११ डिसेंबर 1778 ते 4 मे 1808 या कालावधीत ते छत्रपती पदावर होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा ज्येष्ठ पुत्र प्रतापसिंह यांचा 16 मे 1808 रोजी राज्याभिषेक संपन्न झाला आणि स्वराज्याचे ते आठवे छत्रपती झाले.

या प्रकरणात छत्रपती पदाच्या स्थापनेपासून छत्रपती प्रतापसिंह यांचा राज्याभिषेक होण्यापर्यंतच्या घटनांचा अभ्यासपूर्ण आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : छत्रपती प्रतापसिंह यांचे बालपण, जडणघडण ते राज्यारोहन

छत्रपती शाहू महाराज दुसरे (सातवे छत्रपती) आणि आनंदीबाई यांच्या पोटी **18** जानेवारी **1793** रोजी प्रतापसिंह यांचा जन्म अजिंक्यतारा किल्ल्यावर झाला. छत्रपती हे जरी मराठा साम्राज्याचे प्रमुख पद असले तरी वास्तविक सत्ता पेशव्यांच्या हातात गेल्यामुळे छत्रपती शाहू दुसरे यांच्यावर व संपूर्ण कुटुंबावर पेशव्यांचे संपूर्ण नियंत्रण होते. त्यांच्या खर्चावरही पेशव्यांचे संपूर्ण नियंत्रण होते. प्रतापसिंह यांना शिक्षण देण्यावरही त्यांनी बंदी घातली होती. अशा वातावरणात लहानाचे मोठे झालेल्या प्रतापसिंहांचा वयाच्या पंधराव्या वर्षी **16** मे **1808** रोजी छत्रपती म्हणून राज्याभिषेक झाला. यावेळी **100** तोफांची सलामी देण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी **17** मे **1808** रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा अंबिकाबाई यांच्याशी विवाह संपन्न झाला.

या पाठात छत्रपती प्रतापसिंहांचा जन्म, त्यांचे बालपण, जडणघडण, शिक्षण ते राज्यारोहण या घटनांचा चिकित्सकपणे अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण तिसरे : छत्रपती प्रतापसिंह व पेशवे संबंध आणि ब्रिटिशांचा हस्तक्षेप **(**इ.स.**1808** ते **1818)**

छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या राज्याभिषेकानंतर अधिकृतपणे पेशव्यांशी त्यांचे संबंध प्रस्थापित झाले. यावेळी बाजीराव दुसरा हा पेशवे पदावर कार्यरत होता. दुसऱ्या बाजीरावाने छत्रपतीच्या राज्याभिषेकासाठी **8000** रुपयांची रक्कम मंजूर केली होती. राज्याभिषेकानंतर प्रत्यक्ष राज्यकारभारासाठी छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे नाव शाहू महाराज असे ठेवण्यात आले होते आणि त्याच नावाने शिक्के पाडण्यात आले होते. पेशवा

बाजीराव दुसरा हा अधिकृतपणे छत्रपतींचा नोकर होता. परंतु त्याने छत्रपतीला पूर्णपणे कैदेत ठेवले होते. छत्रपती पदाची कोणतीच गरिमा दुसऱ्या बाजीरावाने ठेवली नाही. त्यामुळे छत्रपती व पेशवे यांच्यातील संबंध कायम तणावपूर्ण राहिले होते. वसईच्या तहानंतर दुसऱ्या बाजीरावावर इंग्रजांचे नियंत्रण वाढले होते. त्यातून पुढे इंग्रज मराठा तिसरे युद्ध उद्भवले आणि त्यात पेशव्यांची सत्ता संपुष्टात आली. छत्रपतींचे सातारा राज्य पुढे काही काळ अस्तित्वात होते.

या प्रकरणात छत्रपती प्रतापसिंहाच्या राज्याभिषेकापासून ते पेशवाईच्या अस्तापर्यंत छत्रपती प्रतापसिंह व पेशवा बाजीराव दुसरा यांच्यातील संबंध कसे होते, यासंबंधीचे संशोधन करून त्याची मांडणी केली जाणार आहे. त्याचबरोबर वसईच्या तहानंतर छत्रपती प्रतापसिंह यांच्याशी ब्रिटिशांचे संबंध प्रस्थापित झाले. त्यासंबंधीचासुद्धा अभ्यास या पाठात केला जाणार आहे.

प्रकरण चौथे: छत्रपती प्रतापसिंह व ब्रिटिश संबंध आणि दरबारातील कटकारस्थाने **(इ.स. 1818** ते **1847)**

तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात पेशव्यांचा पाडाव झाला. **3** जून **1818** रोजी पेशवा दुसरा बाजीराव याने ब्रिटिशांसमोर शरणागती पत्करली आणि पेशवाई संपुष्टात आली. दुसरा बाजीराव यास पेशवे पदावरून पदच्युत करून कानपूरजवळील ब्रह्मवर्त येथे रवानगी करण्यात आली. पेशव्यांच्या नियंत्रणाखालील मोठा प्रदेश ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली आला. छत्रपतींचे छोटे राज्य अस्तित्वात ठेवून छत्रपती प्रतापसिंह यांचे पद कायम ठेवण्यात आले. साताराच्या दरबारात ब्रिटिश रेसिडेंट ग्रँड डफ याचं अधिकृतपणे कार्यालय स्थापन करण्यात आले आणि इथून पुढे प्रत्यक्ष कारभारात ब्रिटिशांचा हस्तक्षेप

व्हायला सुरुवात झाली. छत्रपती प्रतापसिंहाच्या कार्यकाळात पुढील एकूण पाच ब्रिटिश रेसिडेंट नेमण्यात आले होते.

01. जेम्स ग्रँड डफ **(1818 ते 1822)**

02. कर्नल ब्रिग्ज **(1823 ते 1826)**

03. कर्नल रॉबर्टसन **(1827 ते 1832)**

04. कर्नल लॉडविक **(1832 ते 1837)**

05. क. ओव्हन्स **(1837 ते 1839)**

मुंबईचे गव्हर्नर म्हणून पुढील सात गव्हर्नरांचा संबंध सातारा राज्याशी आला.

01. एल्फिन्स्टन **(1819 ते 1827)**

02. मालकम **(1827 ते 1830)**

03. सिडने बेकवीथ **(1830 ते 1831)**

04. अर्ल क्लेअर **(1832 ते 1835)**

05. रॉबर्ट ग्रँट **(1835 ते 1838)**

06. फेरीस **(1838 ते 1839)**

07. रिव्हेट कारनॅक **(1839 ते 1841)**

ब्रिटिशांचा हेर म्हणून काम करणाऱ्या बाळाजीपंत नातूने छत्रपती प्रतापसिंहांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात कटकारस्थाने रचली. त्याचा परिणाम म्हणून छत्रपती प्रताप सिंह यांना **1839** मध्ये पदच्युत करण्यात आले. त्याविरुद्ध दाद मागण्यासाठी छत्रपती प्रतापसिंह यांचे वकीलपत्र घेऊन रंगो बापूजी लंडनला गेले. आपल्या

छत्रपतीला न्याय मिळवून देण्यासाठी रंगो बापूजीने अतोनात हालअपेष्टा सहन करत छत्रपतींच्या हयातभर प्रयत्न केले.

या काळातील घडलेल्या घडलेल्या घडामोडींचा संबंधित कागदपत्रे व संदर्भ साधनांचा आधार घेत चिकित्सक पद्धतीने अभ्यास करण्यात येणार आहे व त्याची मांडणी या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे: छत्रपती प्रतापसिंह यांची लोकोपयोगी कार्य

इसवी सन **1818** स साली सातारचा पहिला ब्रिटिश रेसिडेंट म्हणून ग्रँट डफ ची नियुक्ती करण्यात आली होती. त्याने छत्रपती प्रतापसिंहाला चांगल्या राज्यकारभारासाठी उत्तेजन दिले. अनेक महत्त्वपूर्ण विषयावर दोघांमध्ये दीर्घ चर्चा घडत असत. उत्तरोत्तर छत्रपती प्रतापसिंहांच्या राज्यकारभारात सुधारणा होत गेल्या. पुढे सातारा राज्यात छत्रपती प्रतापसिंह यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. सातारा शहरातील रस्त्यांचे सुधारीकरण करण्यात आले. शहरात रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्यात आली. शहरात एक मोठा राजवाडा बांधण्यात आला. सातारा शहरात व आजूबाजूला दरबारी लोकांसाठी मोठमोठे वाडे बांधले. इतरही काही वाडे बांधण्यात आले. आपल्या राज्यातील नागरिकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पाठशाळेची इमारत बांधण्यात आली. या शाळेत संस्कृत, मराठी व इंग्रजी शिकवण्यात येत होती. याच ठिकाणी एक छापखाना काढून अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ छापले. लोकांच्या वापरासाठी अनेक हौद बांधले. राजधानीतील पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी तलाव बांधून खापरी नळाने त्याचे पाणी शहरात आणले. अशाप्रकारे प्रतापसिंहांच्या लोकोपयोगी कार्यामुळे सातारा शहराला मोठे वैभव प्राप्त झाले.

या प्रकरणात सातारा शहर व परिसरात छत्रपती प्रतापसिंह यांनी केलेल्या विविध लोकोपयोगी कामांचा अभ्यास करून मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : उपसंहार व निष्कर्ष

'छत्रपती प्रतापसिंह यांचे जीवन व कार्याचा चिकित्सक अभ्यास' या शोध प्रबंधाचे हे शेवटचे प्रकरण असून या प्रकरणात उपलब्ध संदर्भ साधनांचा अभ्यास करून मांडलेल्या तथ्यांवर आधारित निष्कर्षांची मांडणी करण्यात येणार आहे. छत्रपती प्रतापसिंहांची स्वतंत्र राज्यकारभाराची धडपड, त्यांचे पेशव्यासोबतचे ताणलेले संबंध, ब्रिटिश रेसिडेंट व गव्हर्नर यांच्यासोबतचे आलेले संबंध व दरबारातील कटकारस्थाने या सर्व घटना व तथ्यांचे विश्लेषण करून अंतिम निष्कर्ष या प्रकरणात मांडले जाणार आहेत.

संदर्भ ग्रंथांची यादी:

01. पेशवे दप्तरातील नोंदी

02. ग्रँड डफ, मराठ्यांची बखर, आवृत्ती सहावी, 1916, निर्णयसागर छापखाना, मुंबई.

03. राजवाडे वि. का. , मराठ्यांच्या इतिहासाची साधने, (खंड 1 ते 22)

04. सरदेसाई गो. स., पेशवा दप्तर, खंड 1 ते 45.

05. बेंद्रे वा. सी. : महारारा‍ष्ट्रेतीहासाची साधने (मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, प्रकाशन,1967)

06. छत्रपती प्रतापसिंहांची डायरी.

07. सातारा महाराज दप्तर.

08. सरदेसाई गो. स. , मराठी रियासत.

09. ठाकरे के. एस.: छत्रपती प्रतापसिंह आणि रंगो बापूजी

10. ताराबाई कालीन कागदपत्रे, (सं. पवार आप्पासाहेब) कोल्हापूर.

11. डॉ. सुनंदा अहिरे, मराठेशाहीतील मध्यवर्ती शासन व्यवस्था आणि तिची स्थित्यंतरे, (अप्रकाशित प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, **1991**)

12. छत्रपती प्रतापसिंहांची पत्रे

13. Brij Kishor, Tarabai and Her Times.

14. Kulkarni Sumitra, History of Satara.

15. Parasnis D. B. : Satara- Brief Notes, (Bombay, Tukaram Jivaji, 1909)

16. Kosambi Meera : Bombay and Poona, A Socio- Ecological study of two Indian Cities. (1656-1900), (Stockholm, 1980)

17. Duff Cunninghum, James Grant : History of Marathas (London, Oxford University Press, 1921)

18. Choksey, R. D. : Mount Stuart Elphinston. (The Indian Years 1796-1827) Bombay, Popular 1971)

19. Political Department Volumes (Bombay Archives) 61 Files Relating to Satara.

20. Choksey R. D.: Raja Pratapsinh of Satara (1818-1839)
(Poona Bharat Itihas Sanshodhak Mandal) (Primary Published Source)

21. Basu B. D. : Story of Satara.(Calcutta, The Modern Review Office, 1922

संशोधक

श्री राम संपत्ती कदम.

(एम. ए. इतिहास, सेट).

मो. नं. **9637298808.**

Email ID:rams.kadam@gmail.com

मार्गदर्शक

प्रा. डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे

(विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक)

मो.नं.:**9923351678,830826234.**

Email ID: babruwanmore@gmail.com